मर्सिडीजच्या 'मेबॅक'चे पुण्यात उत्पादन

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

पुणे : मर्सिडीज-बेंझकडून मर्सिडीज-मेबॅक या आलिशान एसयूव्ही मोटारीचे उत्पादन पुण्यात सुरू करण्यात आले आहे. अमेरिकेबाहेर या मोटारीचे उत्पादन सुरू करण्यासाठी भारताला दिलेली ही पसंती, येथील बाजारपेठ डोळ्यासमोर ठेवून दिली गेली आहे.

मर्सिडीज-बेंझ इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्याधिकारी संतोष अय्यर यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत या निर्णयाची घोषणा केली. कंपनीकडून पहिल्यांदाच मर्सिडीज-मेबॅकसाठी भारताचा आघाडीच्या पाच जागतिक बाजारपेठांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. मर्सिडीज-बेंझने २०२५ मध्ये भारतात १९,००७ मोटारींची विक्री केली. कंपनीच्या आघाडीच्या मॉडेलच्या विक्रीत ११ टक्के वाढ नोंदविण्यात आली असून, इलेक्ट्रिक मोटारीच्या (ईव्ही) विक्रीत १२ टक्के वाढ झाली आहे. कंपनीने महसुलाच्या दृष्टीने २०२५ हे आतापर्यंतचे सर्वोत्तम वर्ष म्हणून नोंद केली आहे.

वस्तू आणि सेवा करातील (जीएसटी) कपातीमुळे कंपनीच्या डिझेल मोटारींना मागणी अधिक वाढली आहे. भारतात अतिश्रीमंत, राजकारणी आणि वलयांकित व्यक्तींमध्ये लोकप्रिय असलेल्या मर्सिडीज-बेंझच्या विक्री झालेल्या एकूण मोटारींमध्ये २० टक्के वाटा ईव्हींचा आहेत. गेल्या वर्षभरात विक्री झालेल्या या मोटारींपैकी ७० टक्के मोटारी या तब्बल १.२५ कोटी रुपये ते ३.१० कोटी रुपये किमतीच्या आहेत. कंपनीने मर्सिडीजने बुधवारी आलिशान मेबॅक सेलिब्रेशन एडिशन बुधवारी सादर केली. याचबरोबर ईक्यूएस एसयूव्ही सेलिब्रेशन एडिशन ही मोटारही सादर केली.

मर्सिडीज-बेंझकडून भारतात लवकरच 'एमबी चार्ज पब्लिक' सुरू केले जाणार आहे. हे नेटवर्क चार्जिंग पॉइंट शोधण्यापासून ते त्याचे पैसे देण्यापर्यंतची सेवा देईल.

आयटी कंपन्यांच्या कमाईला कामगार कायद्यातील तरतुदींमुळे कात्री

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: नव्याने मंजूर कामगार कायद्यानुसार देशातील कर्मचाऱ्यांसाठी चार कामगार संहिता लागू करण्यात झाल्या असून, त्यातील काही तरतुदींची अंमलबजावणी ही माहिती-तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रासह विविध क्षेत्रातील कंपन्यांसाठी आव्हानात्मक ठरली आहे. टीसीएस, इन्फोसिस, एचसीएल टेक आणि विप्रोसारख्या कंपन्यांच्या आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या तिसऱ्या तिमाहीतील नफ्यावर याचा दृश्य परिणाम दिसला आहे.

नवीन कामगार कायदे हे अर्थव्यवस्थेतील आतापर्यंतचे सर्वात मोठी सुधारणा मानली जात आहे. केंद्र सरकारने २९ जुन्या आणि गुंतागुंतीच्या कायद्यांचे एकत्रीकरण करून ४ नवीन कामगार संहिता तयार केल्या आहेत. केंद्र सरकारने २१ नोव्हेंबर २०२५ रोजी या चारही संहिता अधिसूचित केल्या आहेत. कायद्याची पूर्णत्वाने अंमलबजावणी १ एप्रिल २०२६ पासून लागू होणार असली तरी त्यातील काही तरतुदींची अंमलबजावणी नियोक्त्यांनी (कंपनी) सुरू केली आहे.

नवीन कामगार कायद्यानुरूप 'वेतन' या शब्दाची नव्याने व्याख्या केली गेली आहे. यानुसार, कर्मचाऱ्याचे 'मूळ वेतन' (बेसिक) हा एकूण वेतनाच्या (सीटीसी) किमान ५० टक्के असणे अनिवार्य आहे. यामुळे ग्रॅच्युइटी, भविष्य निर्वाह निधी (पीएफ) यावरील कंपन्यांचे योगदान वाढले आहे. रजा रोखीकरणासाठी कंपन्यांच्या तरतुदी वाढल्या आहेत.

माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील आतापर्यंत घोषित तिसऱ्या तिमाहीच्या कंपन्यांच्या कमाईवर नजर टाकल्यास दिसून येते की, टीसीएसने नवीन कामगार कायद्याअंतर्गत २,१२८ कोटी रुपयांची एक-वेळची तरतूद केली, ज्यात ग्रॅच्युइटीसाठी १,८०० कोटी रुपये आणि रजा दायित्वांसाठी ३०० कोटी रुपयांचा समावेश आहे. कायदेशीर आणि पुनर्रचना खर्चासह एकत्रित केल्यास, याचा एकूण नफ्यावर ३,३९१ कोटी रुपयांचा परिणाम झाला आहे. एचसीएल टेकच्या निव्वळ नफ्यात ३.७७ टक्के घट झाली, कंपनीने ४,०७६ कोटी रुपयांचा नफा नोंदवला. मात्र कामगार कायद्याशी संबंधित ९५६ कोटी रुपयांच्या तरतुदीमुळे महसुलात वाढ होऊनही नफा कमी राहिला. तर इन्फोसिसला १,२८९ कोटी रुपयांची तरतूद करावी लागली आहे. विप्रो आणि टेक महिंद्र या सारख्या अन्य अग्रणी कंपन्यांच्या नफ्यावर सुद्धा हा परिणाम दिसण्याची शक्यता आहे.

हाती पडणाऱ्या वेतनांत ७ टक्क्यांपर्यंत घट

नवीन नियमांनुसार, कर्मचाऱ्यांचा मूळ पगार (बेसिक) हे एकूण वेतनाच्या किमान ५० टक्के असणे अनिवार्य आहे. सध्या अनेक आयटी कंपन्यांमध्ये मूळ पगार ३० ते ४० टक्के असतो आणि बाकीचा हिस्सा भत्त्यांच्या स्वरूपात असतो. अनेक मोठ्या आयटी कंपन्यांनी त्यांच्या वेतन रचनेत बदल करण्यास सुरुवात केली आहे. अर्थात कामगिरीवर आधारीत वेतन, भत्ते कमी करून मूळ वेतनांत वाढ सुरू केली आहे. मात्र या वाढीनुरूप कर्मचाऱ्याचे पीएफ योगदानही वाढणार आहे. पीएफला उभारीमुळे उद्याच्या भविष्याची सुरक्षितता वाढली असली, तरी कर्मचाऱ्यांचे दरमहा बँक खात्यात जमा होणारे वेतन ५ ते ७ टक्क्यांनी घटण्याची शक्यता दिसून येते.

'एनएसई'कडून आयपीओसाठी पावले

मार्चअखेरपर्यंत 'सेबी'कडे मसुदा प्रस्ताव दाखल करणार

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : देशातील सर्वांत मोठा भांडवली बाजार असलेला राष्ट्रीय शेअर बाजाराकडून (एनएसई) प्रारंभिक समभाग विक्रीच्या योजनेला गती मिळाली आहे. बाजाराकडून मार्चअखेरपर्यंत सेबीकडे आयपीओसाठी मसुदा प्रस्ताव दाखल करण्यात येईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय शेअर बाजाराच्या या बहुप्रतिक्षित आयपीओसाठी बाजाराकडून गुंतवणूकदार बँक आणि विधी कंपन्यांशी चर्चा सुरू आहे. मसुदा प्रस्ताव अंतिम करण्याच्या दिशेने ही चर्चा सुरू आहे. देशाच्या इतिहासातील हा सर्वांत मोठा आयपीओ ठरण्याची चिन्हे आहेत. बाजाराकडून किती समभाग सूचिबद्ध करण्यात येणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, बाजाराच्या असूचिबद्ध समभागांचे मूल्य ५५ अब्ज डॉलर आहे. बाजार नियंत्रक सेबीच्या 'ना हरकत प्रमाणपत्रा'नंतर एनएसईकडून बँकर आणि विधिज्ज्ञांची नियुक्ती करण्यात येईल.

या प्रकरणी राष्ट्रीय शेअर बाजाराने अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. दरम्यान, बाजाराच्या आयपीओला या महिन्याच्या अखेरीस नियामक मंजुरी दिली जाईल, असे वक्तव्य सेबीच्या अध्यक्षांनी शनिवारी (१० जानेवारी) केले आहे. हे प्रमाणपत्र मिळणे म्हणजे या आयपीओतील सर्वात मोठा अडसर दूर होईल.

अडसर व दीर्घकाळ प्रतीक्षा

राष्ट्रीय शेअर बाजार हा देशातील सर्वांत मोठा भांडवली बाजार आहे. बाजाराकडून आयपीओसाठी २०१६ पासून प्रयत्न सुरू आहेत. काही मोजक्या दलालांना कथित प्राधान्य व विशेष वर्तणुकीच्या सह-स्थानक (को-लोकेशन) सुविधेप्रकरणी सुरू असलेल्या चौकशीमुळे आयपीओ प्रक्रियेस विलंब झाला. सध्या हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. गेल्या वर्षी या प्रकरणी बाजाराने १३.८७ अब्ज रुपयांच्या तडजोडीची तयारी दर्शविली. अद्याप याला नियामकांनी मंजुरी दिलेली नाही.

मंदीवाल्यांचा पगडा कायम; सेन्सेक्सचे २४५ अंश नुकसान

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : वाढता भू-राजकीय तणाव आणि माहिती तंत्रज्ञान, उपभोग्य वस्तू आणि निवडक बँकिंग क्षेत्रातील ब्लू-चिप समभागांमधील घसरणीमुळे प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी बुधवारी घसरले. यामुळे सलग दोन सत्रात मिळून सेन्सेक्स ५०० अंशांनी घसरला आहे. परदेशी निधीचे सततचे निर्गमन आणि नवीन आयात शुल्कासंबंधित अनिश्चिततेमुळे गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

सेन्सेक्स २४४.९८ अंशांनी, म्हणजेच ०.२९ टक्क्यांनी घसरून ८३,३८२.७१ पातळीवर स्थिरावला. दिवसादरम्यान, त्याने ४४२.४९ अंश गमावत ८३,१८५.२० या सत्रातील नीचांकी पातळीला स्पर्श केला होता. दुसरीकडे निफ्टी ६६.७० अंशांनी २५,६६५.६० पातळीवर बंद झाला.

भारत-अमेरिका व्यापार कराराबाबतच्या अनिश्चिततेमुळे देशांतर्गत बाजारपेठांमध्ये सावधगिरीचे वातावरण कायम आहे. परदेशी संस्थागत गुंतवणूकदार जोखीम पत्करण्यास तयार नसून हात राखून व्यवहार करण्याकडे त्यांचा कल दिसून येत आहे. तथापि, अमेरिकेशी व्यापार करारावर या आठवड्यात वाटाघाटी पुन्हा सुरू झाल्याने नवीन आशा निर्माण झाल्या आहेत. अमेरिकेतील व्याजदर कपातीच्या अपेक्षेने रोख्यांच्या किमती वाढण्यासह धातू क्षेत्रातील समभागांमध्ये तेजी दिसून आली. नियंत्रित महागाई आणि भू-राजकीय तणावामुळे सुरक्षित गुंतवणुकीकडे वाढता कल यासाठी कारणीभूत आहे. स्थानिक स्तरावर मिडकॅप आणि स्मॉलकॅप क्षेत्रातील कंपन्यांमध्ये निवडक खरेदी झाल्यामुळे व्यापक बाजारपेठेनी चांगली कामगिरी केली. गुंतवणूकदार प्रमुख बँकांच्या कमाईच्या निकालांची वाट पाहत असल्याने इक्विटी बाजारात संमिश्र व्यवहार झाले, असे निरीक्षण जिओजित इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडचे संशोधन प्रमुख विनोद नायर यांनी नोंदवले.

Advertisement for Duplicate Share Certificate

I Mrs. Radhika Vinayak Phadke, the member of the Nav Ajantha Sahakari Griharachana Sanstha Maryadit and holding Flat No. 3A / A2 /26 in the Society, have reported to the Society that the Original Share Certificate No. 158 for 5 (Five) Shares bearing Nos. From 786 to 790 have been lost and an application has been made for duplicate Share Certificate.

The Society hereby invites claims and objections from claimants/ objector or objectors for issuance of duplicate Share Certificate within the period of 14 (fourteen) days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/ objections for issuance of duplicate Share Certificate to the Secretary of Nav Ajantha Sahakari Griharachana Sanstha Maryadit, at near Krishna Hospital, Paud Road, Kothrud, Pune - 411038. If no claims/objections are received within the period prescribed above, the Society shall be free to issue duplicate Share Certificate in such manner as is provided under the bye-laws of the Society. The claims/objections, if any, received by the Society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the Society. A copy of the registered bye-laws of the Society is available for inspection by the claimants/objectors, with the Secretary of the Society between 10.00 AM to 6.00 PM on working days from the date of the publication of the notice till the date of expiry of its period.

For and on behalf of Nav Ajantha Sahakari Griharachana Sanstha Maryadit,
Sd/-
(Hon. Secretary)

Date : 11/01/2026
Place : Pune.

बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda **स्ट्रेस्ड ॲसेट्स मॅनेजमेंट व्हर्टीकल बँक ऑफ बडोदा, बडोदा कॉर्पोरेट सेंटर**, सी-२६, जी-ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा पूर्व, मुंबई- ४०००५१.
ई-मेल : wfd.bcc@bankofbaroda.co.in

कारणे दाखवा सूचना

Ref:-BOB:SAMV:118:44&45 दिनांक: ०२.०१.२०२६

श्री. मधुकर रामदास गायधने, सर्व्हे नं. १९ १ मुंजबा वस्ती, धानोरी, लोहेगाव रोड, विठ्ठल मंदिर मागे, पुणे, महाराष्ट्र, पिन ४११०१५ आणि सर्व्हे नं. २८ ८४, प्रवीण अपार्टमेंट, फ्लॅट नं. ११, तानाजी नगर, चिंचवडगाव, पुणे, महाराष्ट्र, पिन ४११०१५

आमच्या बँकेतील आयडेंटिफिकेशन कमिटी ऑन विलफुल डिफॉल्टर यांनी आम्हास खालील पार्श्वभूमीवर आपणास विलफुल डिफॉल्टर (हेतुपुरस्सर थकबाकीदार) म्हणून वर्गिकृत करण्यासाठी एस.सी.एन. जारी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

१) कर्जदाराने बँकेकडून निवासी फ्लॅट घेण्यासाठी रु. ०.४४ कोटीचे गृह कर्ज घेतले असून त्यासाठी जाली कागदपत्रे/खोटी/बनावट कागदपत्रे, ज्यामधे बनावट खरेदी करार, गहाण देण्यासाठीचे ना हरकत प्रमाणपत्र आणि बांधकाम ठेकेदाराकडून दिले आहे असे बनावट मागणी पत्र इ. बँकेस दिले आहे. बँकेने कर्ज वितरित केले असून बँकर्स चेक क्र.५२९३१६ दिनांक १४.०७.२०२३, हा भागवत परदेशी रिअॅल्टी यांचे नावे दिला होता तो बँकेने पासही केला आहे. तथापि, बँकेच्या या कर्ज रकमेतून कोणतीही मिळकत खरेदी केलेली नाही. बँकेने दिलेले कर्ज हेतुपुरस्सर, ठरवून अन्यत्र वापरले आहे.

आपली ही कृती रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या, मास्टर डिरेक्शन ऑन ट्रीटमेंट ऑफ विलफुल डिफॉल्टर च्या कलम ३ (१) (xviii) (A) (c) - सायफनिंग ऑफ फंडस् च्या तरतुदीत येते. त्यानुसार **दिनांक ०२.०१.२०२६** रोजी आपणास एस.सी.एन. जारी करण्यात आली आहे.

आपणास वरील पत्त्यावर पाठविलेली **दिनांक ०३.०१.२०२६** रोजीची एस.सी. नोटीस जारी न होता परत आली आहे, त्यामुळे ही सदर नोटीस वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे. आपणास विलफुल डिफॉल्टर म्हणून का वर्गीकृत करु नये यासाठीचे आपले म्हणने आपण ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत वरील पत्त्यावर सादर करावे. वर नमूद केलेल्या कालमर्यादेत जर आपणाकडून जर काही निवेदन आले नाही तर आयडेंटिटी कमिटी आपणास विलफुल डिफॉल्टर म्हणून वर्गिकृत करण्याची प्रक्रिया पुढे नेतील.

सही/-
उपव्यवस्थापक

(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)

नॉर्थर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड

नोंद. कार्यालय : 10वा मजला, फेज-I, आयआयटी - मद्रास रिसर्च पार्क, कनागम व्हिलेज, तारमणी, चेन्नई - 600113, तमिळनाडू.

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) ॲक्ट, 2002 च्या अनुच्छेद 13(2) अंतर्गत मागणी सूचना.

तुम्ही, खालील तक्त्याच्या परिच्छेद क्र. 1 मध्ये नमूद केलेले कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदार आणि गहाणदार यांनी तुमची स्थावर मालमत्ता तारण ठेवून नॉर्थर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड कडून कर्ज घेतले आहे. तुम्ही सर्वांनी त्यात केलेल्या चुकांमुळे, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार तुमचे कर्ज खाते नॉन-परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे आणि नॉर्थर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड यांनी सुरक्षित धनको म्हणून सरफेसी कायदा तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 3 सह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम 13(2) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून मागणी सूचना जारी केली आहे ज्यामध्ये सूचनेतील नमूद केलेली रक्कम 60 दिवसांच्या आत परत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तुमच्याकडून नॉर्थर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड ला किती रक्कम देय आहे याचे अधिक तपशीलवार वर्णन खालील तक्त्यात दिले आहे. कृपया नोंद घ्या कि, त्यासोबत देयकाच्या तारखेपर्यंतच्या रकमेवरील पुढील व्याज आणि शुल्क देखील लागू असतील.

1) अर्जदार / सह-अर्जदार / जामीनदार आणि गहाणदारांची नावे :
(अ) अनिता कैलास नवरे (कर्जदार) (ब) कैलास ज्ञानेश्वर नवरे (सह-कर्जदार), पत्ता : गाव - भांबोली, ता. खेड जिल्हा पुणे, गट क्र. 355/2, ग्रामपंचायत मिळकत क्र - 386, तिसरा मजला, भांबोली, चाकण, पुणे - 410501.
2) कर्जाचे तपशील (वितरण / एनपीए आणि सूचना दिनांक / थकबाकी रक्कम :
(अ) कर्ज खाते क्र. 102056986949 करिता रक्कम रु. 50,92,534/- (रुपये पन्नास लाख ब्याण्णव हजार पाचशे चौतीस फक्त), (ब) नॉन-परफॉर्मिंग ॲसेट दि. 03 जानेवारी 2026 रोजी, (क) मागणी सूचना दिनांक 12 जानेवारी 2026. थकबाकी देय : रु. 53,53,115.12/- (रुपये त्रेपन्न लाख त्रेपन्न हजार एकशे पंधरा आणि बारा पैसे फक्त) दि. 09/01/2026 रोजी नुसार सोबत उपरोक्त रकमेवर करारानुसार भविष्यातील व्याज सोबत आनुषंगिक खर्च, किंमत, शुल्क, इ.
3) अचल मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, गाव - भांबोली, ता. खेड, जिल्हा पुणे, गट क्र. 355/2, क्षेत्रफळ 00 हे. 10 आर. आणि ग्रामपंचायत मिळकत क्र. - 386 आरसीसी बांधकाम तळमजला क्षेत्रफळ 6000 चौ. फू. पहिला मजला क्षेत्रफळ 6000 चौ. फू. दुसरा मजला क्षेत्रफळ 6000 चौ. फू. तिसरा मजला क्षेत्रफळ 6000 चौ. फू. एकूण बांधकाम क्षेत्रफळ 24000 चौ. फू. भांबोली, चाकण, पुणे - 410501 क्षेत्रफळ 2230.48 चौ. मीटर आणि **चतुःसीमा पुढीलप्रमाणे :- पूर्व** : कैलास नवरे मालमत्ता, **पश्चिम** : रामदास सोपान राऊत मालमत्ता, **उत्तर** : गावठाण रस्ता, **दक्षिण** : कैलास नवरे मालमत्ता.

तुम्हाला, वरील तक्त्यात नमूद केलेल्या तपशीलांनुसार एकूण रक्कम सोबत देयकाच्या तारखेपर्यंतचे कराराच्या दराने पुढील व्याज आणि इतर खर्च, शुल्क आणि त्यावरील आनुषंगिक खर्च हि रक्कम ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून 60 दिवसांच्या आत भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे, असे न केल्यास, नॉर्थर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड ची देय रक्कम वसूल करण्यासाठी वर उल्लेख केलेल्या तारण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम 13(4) आणि कलम 14 अंतर्गत योग्य ती कार्यवाही सुरू करण्यास खालील स्वाक्षरीकार यांना भाग पडेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम 13(13) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री / भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई करण्यात येत आहे.

स्वा./-
प्राधिकृत अधिकारी
नॉर्थर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड

दिनांक : 15 जानेवारी 2026
ठिकाण : पुणे

ऋण वसुली न्यायाधीकरण, पुणे

युनिट क्र. ३०७ ते ३१०, ३रा मजला, काकडे बिझ आयकॉन बिल्डींग, शिवाजीनगर, पुणे ४११००५

Case No.: OA/767/2025

सदर कायद्याच्या कलम १९, उपकलम ४ आणि ऋण वसुली न्यायाधीकरण (प्रोसिजर) नियम १९९३ च्या नियम ५ च्या उपनियम २ए अन्वये समन्स. **Exh. No.: 12868**

भारतीय स्टेट बँक विरुद्ध प्राईम प्रॉडक्ट्स

प्रति,
(१) प्राईम प्रॉडक्ट्स डी/ब्ल्यू/एस/ओ- तौसीफ तफझूल साबूवाला यूनिट नं. ०३, प्लॉट नं. ७१, १ बी, २ ३ खिरा इंडस्ट्रियल को-ऑप सोसायटी, भोसरी, पुणे, महाराष्ट्र- ४११०२६ **तसेच,** गट नं. ४८, एसार कंपनी जवळ, पुणे-नाशिक रोड, चिंबली फाटा, ता. खेड, पुणे, महाराष्ट्र- ४१०५०१
(२) तौसीफ तफझूल साबूवाला फ्लॅट नं. बी ६०४, ब्रह्मा एक्सब्रन्स एनाआबीएम रोड, कोंढवा, पुणे, महाराष्ट्र- ४११०४८.
(३) सौ. फातिमा तौसीफ साबूवाला फ्लॅट नं. बी ६०४, ब्रह्मा एक्सब्रन्स एनाआबीएम रोड, **कोंढवा, पुणे, महाराष्ट्र- ४११०४८. तसेच,** बी ३ खिरा इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स ७१/१ जनरल ब्लॉक एमआयडीसी, भोसरी, पुणे, महाराष्ट्र - ४११०२६

समन्स

ज्याअर्थी **ओए/७६७/२०२५** हा मा. पीठासीन अधिकारी/निबंधक यांचेसमोर दिनांक **०५.०१.२०२६** रोजी सुनावणीसाठी सुचीबध्द करण्यात आला होता.

ज्याअर्थी मा. न्यायाधीकरण यांचे समोर कलम १९(४) अन्वये **रुपये ३,६४,४२,५९१/-** इतक्या रकमेच्या वसुलीसाठी (दस्तावेज इ. च्या प्रती जोडलेल्यासह) दाखल करण्यात आलेल्या अर्जानुसार मा. पीठासीन अधिकारी नोटीस/समन्स जारी करीत आहे.

सदर कायद्याच्या कलम १९ उपकलम (४) अन्वये तुम्ही प्रतिवादी यांस निर्देशित करण्यात येते की

(i) सदर समन्स मिळाल्यापासून तीस दिवसांचे आत सदर अर्जात प्रार्थना केल्यानुसार आदेश का जारी करु नये याची कारणे सांगावीत.
(ii) अर्जदाराने मूळ अर्जात अनु. क्र. ३ए येथे नमूद केलेल्या मिळकती व्यतिरिक्त अन्य मिळकती असल्यास त्याचा तपशील सादर करावा.
(iii) आपणास सदर अन्य मिळकती आणि अर्जदाराच्या मूळ अर्जात कलम क्र. ३ए मध्ये नमूद केलेली तारण मिळकतीबाबत विक्री अथवा अन्य मार्गाने काही व्यवहार करण्यावर प्रतिबंध करण्यात येत आहे.
(iv) मूळ अर्जात अनु. ३ ए मधे नमूद केलेल्या आणि अन्य जाहीर केलेल्या मालमत्ता ज्यामध्ये तारण हितसंबंध (सिक्युरिटी इंटरेस्ट) निर्माण झाला आहे त्या मिळकतीबाबत आपण विक्री, तबदील करणे, दीर्घ मुदतीच्या भाडेकराराने किंवा अन्य मार्गाने, केवळ सर्वसाधारण व्यवसायाचा भाग सोडून, कोणत्याही प्रकारे व्यवहार करु नये.
(v) त्यांच्या सर्वसामान्य व्यवसायाचा भाग म्हणून झालेल्या विक्रीतून आलेली रक्कम आपण ज्या बँकेचा किंवा वित्तसंस्थेचा सदर तारण मिळकतीवर हितसंबंध निर्माण झाला आहे तेथील खात्यावर जमा करणे आपणावर बंधनकारक आहे.

आपणास आणखी निर्देश देण्यात येत आहे की आपण आपला लेखी जबाब/ उत्तर दाखल करावा आणि त्याची प्रत अर्जदारास पाठवावी आणि **दिनांक ०९.०३.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता** न्यायाधीकरणा समोर हजर रहावे. असे न केल्यास सदर अर्जाची सुनावणी आपल्या गैरहजेरीत केली जाईल आणि त्यावर निर्णयही घेतला जाईल.

माझ्या सहीनिशी आणि न्यायाधीकरणाच्या शिक्यासह दिनांक ०८.०१.२०२६ रोजी अदा केले.

शिक्का

समन्स जारी करण्याचा अधिकार असणाऱ्या अधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी
निबंधक
ऋण वसुली न्यायाधीकरण, पुणे

हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंद. कार्यालयः 09, कम्युनिटी सेंटर, बसंत लोक, वसंत विहार, नवी दिल्ली- 110057.
फोनः 011 49267000, **टोल फ्री क्रमांकः** 1800 212 8800,
ईमेलः customer.care@herohfl.com वेबसाइटः www.herohousingfinance.com |
CIN : U65192DL2016PLC30148. संपर्क पत्ताः तिसरा मजला, 301 ते 304, ए-विंग, कपिल टॉवर, डॉ. आंबेडकर रोड, आरटीओ कार्यालयाजवळ, पुणे, महाराष्ट्र-411001.

ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)

(सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेन्ट रुल्स, 2002 च्या नियम 8(1) सह वाचण्यात येणारया परिशिष्ट IV नुसार)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 3 सह वाचण्यात येणारया अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद कर्जदारांना एक मागणी सूचना निर्गमित केली ज्यात त्यांना सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत सूचनेत नमूद रकमेची परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सदर नियम 8 सह वाचण्यात येणारया सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे.

याद्वारे कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सावधगिरीची सूचना देण्यात येते की सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांच्या खाली नमूद रकमेच्या सोबत खाली नमूद केलेल्या दिनांकापासून त्यावरील व्याज आणि दंडात्मक व्याज, शुल्क, खर्च इ. एवढ्या रकमेच्या भाराधीन असेल.

अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13 च्या उप-विभाग (8) मधील तरतुदींकडे वेधण्यात येते.

कर्ज खाते क्र.	बाध्यताधारी/कायदेशीर वारस/ कायदेशीर प्रतिनिधी यांचे नाव	मागणी सूचना दिनांक/ मागणी सूचनेनुसार रक्कम	ताबा दिनांक (रचनात्मक/प्रत्यक्ष)
HHFBRMLAP 24000046050	रवींद्र प्रभाकर पाटील, स्वाती रवींद्र पाटील	22-ऑक्टोबर-2025 रु. 1916078/- दिनांक 14.10.2025 रोजी नुसार	10.01.2026 (सांकेतिक)

सुरक्षित मालमत्ता/अचल मालमत्तांचे वर्णनः पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, ग्रामपंचायत मूल्यांकन यादी मालमत्ता क्र. 546 एकूण मोजमाप क्षेत्रफळ 5381 चौ. फू. आणि त्याचे बांधकाम मोजमाप क्षेत्रफळ 540 चौ. फू. गाव- वरकुटे बुद्रुक, तालुका- इंदापूर, जिल्हा पुणे येथे स्थित. चतुःसीमाः- पूर्वेकडेः रवींद्र पाटील यांची उर्वरित जमीन, पश्चिमेकडेः रवींद्र पाटील यांची उर्वरित जमीन, दक्षिणेकडेः रस्ता, उत्तरेकडेः रवींद्र पाटील यांची उर्वरित जमीन.

दिनांकः 15.01.2026
ठिकाणः पुणे

स्वा/-
प्राधिकृत अधिकारी, हिरो हाऊसिंग फायनान्स लिमिटेड करिता

रेप्को होम फायनान्स लिमिटेड

पुणे शाखा : कार्यालय क्र. 203, सत्यभामा संकुल, दुसरा मजला, मोदी गणपतीजवळ, 529 नारायण पेठ, पुणे इ 411030.

ई-लिलाव विक्री सूचना

सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत रेप्को होम फायनान्स लि. कडे तारण असलेल्या स्थावर मालमत्तेची विक्री.

ज्याअर्थी, पुढील कर्जदार आणि सह-कर्जदार यांनी रेप्को होम फायनान्स लिमिटेड, पुणे शाखा यांच्याकडून कर्ज रक्कम घेतली आहे, आणि त्या दायित्वाचे तपशील खाली दिले आहेत, तर कंपनीने सरफेसी कायद्यांतर्गत सूचना जारी केली असून आणि प्राधिकृत अधिकारयाने तारण असलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे आणि खाली नमूद केलेल्या तारखांना सूचना जारी केली आहे आणि कंपनीने आता सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स 2002 च्या कलम 8 आणि 9 अंतर्गत या मालमत्तेची "जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' या तत्त्वावर विक्री करण्याचा निर्णय घेतला आहे.

ई-लिलाव दिनांक आणि वेळ : 13.02.2026, सकाळी 11.00 - दुपारी 12.00 वा.
(5 मिनिटांच्या अमर्यादित स्वयं विस्तारासह)

ई-निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक आणि वेळ : 12.02.2026, दुपारी 4.00 वा.

स. क्र. 1 : कर्जदार : श्री. सुहास बी. नारुळे, बाळकृष्ण नारुळे, **सह-कर्जदार : सौ. सुप्रिया सुहास नारुळे, सुहास बी नारुळे** यांची पत्नी आणि जामीनदार : **श्री. प्रकाश राजाराम साठे,** श्री. राजाराम आरा साठे यांचा मुलगा; मागणी सूचना दिनांक : **17.06.2022;** मागणी सूचनेनुसार दावा केलेली रक्कम **(खाते क्र. 1471870001020)** रु. 9,98,300/- **दि. 17.06.2022** रोजी नुसार सोबत पुढील व्याज, खर्च आणि किंमत; ताबा घेतल्याचा दिनांक : 12.10.2022; सध्याची थकबाकी रक्कम : **रु. 16,98,291/- दि. 08.01.2026** रोजी नुसार.

मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, **फ्लॅट क्र. 207 दुसरया मजल्यावर मोजमाप 322 चौ. फू. म्हणजे 29.92 चौ. मी. बिल्ट अप श्रीनाथ हाइट्स म्हणून ओळखल्या जाणारया इमारतीत आणि जमीन मोजमाप 00 हे. 2.25 आर म्हणजे 225 चौ. मी.** यावर बांधलेले, जमीन संबंधित स. क्र. 15, हिस्सा क्र. 7/1बी एकूण मोजमाप 00 हे. 12.5 आर्स आणि जमीन मोजमाप 00 हे. 2.5 आर्स पासून पैकी, स. क्र. 15, हिस्सा क्र. 7/1ए, हिस्सा क्र. 6/2बी पासून पैकी, एकूण मोजमाप 00 हे. 12.5 आर्स गाव खडकवासला तालुका हवेली जिल्हा पुणे येथे स्थित आणि पुणे जिल्हा परिषदे च्या हद्दीत आणि सदर फ्लॅट मालमत्तेच्या चतुःसीमा पुढीलप्रमाणे : पूर्व : फ्लॅट क्र. 208, पश्चिम : फ्लॅट क्र. 206, उत्तर : अंतर्गत रस्ता, दक्षिण : जिना.

राखीव किंमत	रु. 8,72,000/-	ईएमडी (राखीव किंमतीच्या 10%)	रु. 87,200/-	किमान बोली वृद्धी रक्कम	रु. 10,000/-

अ. क्र. 2 : कर्जदारः श्री. दीपक हिवरकर, यशवंत हिवरकर यांचा मुलगा, सह-कर्जदार : **सौ. सोनाली हिवरकर,** दीपक हिवरकर यांची पत्नी आणि **जामीनदार : श्री. किरण प्रकाश तायडे,** प्रकाश सोमा तायडे यांचा मुलगा; मागणी सूचना दिनांक : **22.07.2021;** मागणी सूचनेनुसार दावा केलेली रक्कम (खाते क्र. 1471870001286) रु. **13,30,925/- दि. 19.07.2021** रोजी नुसार सोबत पुढील व्याज, खर्च आणि किंमत; **ताबा घेतल्याचा दिनांक : 29.03.2022;** सध्याची थकबाकी रक्कम : **रु. 26,02,692/- दि. 08.01.2026 रोजी नुसार.**

मालमत्तेचे वर्णन : अनुसूची - अ : पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, जमीन संबंधित स. क्र. 204, हिस्सा क्र. 9 त्याचा जुना स. क्र. 165/1 ए/1 एकूण मोजमाप सुमारे 04 हे. 62 आर्स पोटखराबा यांचा समावेश त्यापैकी जमीन मोजमाप सुमारे 00 हे. 02 आर्स म्हणजे 200 चौ. मी. **गाव फुरसुंगी,** पुणे येथे स्थित, ग्रामपंचायत फुरसुंगी, पुणे, जिल्हा परिषद पुणे आणि **तालुका पंचायत समिती हवेली** आणि उप नोंदणी जिल्हा पुणे, तालुका हवेली, जिल्हा पुणे च्या हद्दीत आणि चतुःसीमा पुढीलप्रमाणे : पूर्व किंवा त्या दिशेने : श्री. जयश्री मधुकर देवडे यांची मालमत्ता, पश्चिम किंवा त्या दिशेने : त्याच स. क्र. पासून उर्वरित मालमत्ता, उत्तर किंवा त्या दिशेने : 15 फू., रस्ता, दक्षिण किंवा त्या दिशेने : त्याच स. क्र. पासून उर्वरित मालमत्ता

अनुसूची -ब : पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, **फ्लॅट क्र. 402** मोजमाप सुमारे **477 चौ. फू., म्हणजे 44.33 चौ. मी.,** बिल्ट -अप चौथ्या मजल्यावर स्थित, **"साई प्रेरणा अपार्टमेंट"** म्हणून ओळखल्या जाणारया इमारतीत, जमीन संबंधित स. क्र. 204, हिस्सा क्र. 9, त्याचा जुना स. क्र. 165/1 ए/1 एकूण मोजमाप सुमारे 04 हे. 62 आर्स पोटखराबा यांचा समावेश त्यापैकी जमीन मोजमाप सुमारे 00 हे. 02 आर्स म्हणजे 200 चौ. मी. यावर बांधलेले, **गाव फुरसुंगी,** पुणे येथे स्थित, जे **ग्रामपंचायत फुरसुंगी, पुणे,** जिल्हा परिषद पुणे आणि तालुका पंचायत समिती हवेली आणि उप नोंदणी जिल्हा पुणे, **तालुका हवेली, जिल्हा पुणे** च्या हद्दीत आणि सदर फ्लॅट च्या चतुःसीमा पुढीलप्रमाणे : पूर्व किंवा त्या दिशेने : फ्लॅट क्र. 403 आणि श्री. शेख मोहम्मद, आयुब यांची मालमत्ता, पश्चिम किंवा त्या दिशेने : श्री. विठ्ठल रायसिंग भोसले यांची मालमत्ता, उत्तर किंवा त्या दिशेने : 20 फू., रस्ता, दक्षिण किंवा त्या दिशेने : फ्लॅट क्र. 401 आणि श्री. छोटेलाल राजबली यादव यांची मालमत्ता.

राखीव किंमत	रु. 16,32,000/-	ईएमडी (राखीव किंमतीच्या 10%)	रु. 1,63,200/-	किमान बोली वृद्धी रक्कम	रु. 25,000/-

अ. क्र. 3 : कर्जदार : श्री. राकेश एम पहाडिया, माघ राज पहाडिया यांचा मुलगा, सह-कर्जदार : सौ. रंजन आर पहाडिया, राकेश एम पहाडिया यांची पत्नी आणि जामीनदार : श्री. राजू रामचंद्र थोरवे, रामचंद्र जानकोबा थोरवे यांचा मुलगा; मागणी सूचना दिनांक : **22.07.2021;** मागणी सूचनेनुसार दावा केलेली रक्कम **(खाते क्र. 1471870000995) रु. 42,73,439/-** दि. 19.07.2021 रोजी नुसार सोबत पुढील व्याज, खर्च आणि किंमत; ताबा घेतल्याचा दिनांक : **17.05.2022;** सध्याची थकबाकी रक्कम : **रु. 75,55,396/-** दि. 08.01.2026 रोजी नुसार.

मालमत्तेचे वर्णन : अनुसूची -अ : पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, जमीन स. क्र. 13/5/1, 13/5/3, 13/5/4, 13/5/5, 13/5/6, 13/5/7, 13/5/8 एकूण मोजमाप 0.हे. = 99 आर गाव येवलेवाडी तालुका, हवेली जिल्हा पुणे येथे स्थित, ज्याची चतुःसीमा पुढीलप्रमाणे :- पूर्व किंवा त्या दिशेने : श्री. निंबाळकर यांची जमीन, पश्चिम किंवा त्या दिशेने : पुणे सासवड रोड, उत्तर किंवा त्या दिशेने : स. क्र. 13 पैकी उर्वरित जमीन, दक्षिण किंवा त्या दिशेने : स. क्र. 13 पैकी जमीन.

अनुसूची -ब : पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, **फ्लॅट क्र. 405** मोजमाप **903 चौ. फू., म्हणजे 83.92** चौ. मी., **विक्रीयोग्य बिल्ट अप + 1 कार पार्किंग हा फ्लॅट "वृंदावन रीजन्सी"** इमारत क्र. बी म्हणून ओळखल्या जाणारया इमारतीच्या चौथ्या मजल्यावर, जमीन स. क्र. 13/5/1, 13/5/3, 13/5/4, 13/5/5, 13/5/6, 13/5/7, 13/5/8 यावर स्थित किंवा बांधलेले, गाव येवलेवाडी तालुका, हवेली जिल्हा, पुणे येथे स्थित.

राखीव किंमत	रु. 41,43,000/-	ईएमडी (राखीव किंमतीच्या 10%)	रु. 4,14,300/-	किमान बोली वृद्धी रक्कम	रु. 50,000/-

अ. क्र. 4 : कर्जदार : श्री. सचिन विलास जाधव, विलास बिवा जाधव यांचा मुलगा, सह-कर्जदार : श्री. विलास बिवा जाधव, 2. सौ. प्रेणा सचिन जाधव, सचिन विलास जाधव यांची पत्नी आणि जामीनदार : श्री. विनोद बाबुराव कांदे; मागणी सूचना दिनांक : **03.09.2020;** मागणी सूचनेनुसार दावा केलेली रक्कम (खाते क्र. 1471870001328) **रु. 37,19,336/-** दि. **27.08.2020** रोजी नुसार सोबत पुढील व्याज, खर्च आणि किंमत; ताबा घेतल्याचा दिनांक : 29.11.2021; सध्याची थकबाकी रक्कम **: रु. 87,28,586/- दि. 08.01.2026** रोजी नुसार

मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे स. क्र. 49, हिस्सा क्र. 3/2/17 मोजमाप 00 हे. 1.5 आर्स म्हणजे **1500 चौ. फू., म्हणजे 139.35 चौ. मी.,** सोबत त्यावरील इमारत मोजमाप सुमारे 1560 चौ. फू., म्हणजे 144.98 चौ. मी., गाव धानोरी, **तालुका हवेली, जिल्हा पुणे** येथे स्थित आणि पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत आणि सदर मालमत्तेच्या **चतुःसीमा पुढीलप्रमाणे** : पूर्व किंवा त्या दिशेने : खुली जागा, पश्चिम किंवा त्या दिशेने : रस्ता, उत्तर किंवा त्या दिशेने : संलग्न भिंत, दक्षिण किंवा त्या दिशेने : खुला प्लॉट.

राखीव किंमत	रु. 58,88,000/-	ईएमडी (राखीव किंमतीच्या 10%)	रु. 5,88,800/-	किमान बोली वृद्धी रक्कम	रु. 25,000/-

ई-लिलाव प्रक्रियेसाठी, कृपया मे. सी1 इंडिया प्रा. लि., श्री. प्रभाकरन -7418271709 यांच्याशी संपर्क साधा. मालमत्तेच्या तपासणीसाठी इच्छुक बोलीदार शाखा प्रमुख, रेप्को होम फायनान्स लिमिटेड, पुणे शाखा, संपर्क क्र. 020-24431956 आणि 93722-67110 यांच्याशी सर्व कामकाजाच्या दिवसांमध्ये सकाळी 10 ते संध्याकाळी 5 दरम्यान संपर्क साधू शकतात.

दिनांक : 12.01.2026 **प्राधिकृत अधिकारी, रेप्को होम फायनान्स लिमिटेड**

नॉर्थर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड

नोंद. कार्यालय : 10वा मजला, फेज-I, आयआयटी - मद्रास रिसर्च पार्क, कनागम व्हिलेज, तारमणी, चेन्नई - 600113, तमिळनाडू.

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) ॲक्ट, 2002 च्या अनुच्छेद 13(2) अंतर्गत मागणी सूचना.

तुम्ही, खालील तक्त्याच्या परिच्छेद क्र. 1 मध्ये नमूद केलेले कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदार आणि गहाणदार यांनी तुमची स्थावर मालमत्ता तारण ठेवून नॉर्थर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड कडून कर्ज घेतले आहे. तुम्ही सर्वांनी त्यात केलेल्या चुकांमुळे, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार तुमचे कर्ज खाते नॉन-परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे आणि नॉर्थर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड यांनी सुरक्षित धनको म्हणून सरफेसी कायदा तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 3 सह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम 13(2) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून मागणी सूचना जारी केली आहे ज्यामध्ये सूचनेतील नमूद केलेली रक्कम 60 दिवसांच्या आत परत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तुमच्याकडून नॉर्थर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड ला किती रक्कम देय आहे याचे अधिक तपशीलवार वर्णन खालील तक्त्यात दिले आहे. कृपया नोंद घ्या कि, त्यासोबत देयकाच्या तारखेपर्यंतच्या रकमेवरील पुढील व्याज आणि शुल्क देखील लागू असतील.

1) अर्जदार / सह-अर्जदार / जामीनदार आणि गहाणदारांची नावे :
(अ) विनोद रभाजी तुपे, श्री. रभाजी बापूराव तुपे यांचा मुलगा (कर्जदार) (ब) सुवर्णा विनोद तुपे, रभाजी बापूराव तुपे (सह-कर्जदार), पत्ता : स क्र 12/18, ड्रायव्हर कॉलनी, काळेवाडी फाटा, महेश किराणा स्टोअर जवळ, थेरगाव, काळेवाडी, पिंपरी चिंचवड, पुणे, महाराष्ट्र - 411033 **तसेच येथे** : तळ + 02 मजले, हनुमान नगर, संभाजी नगर, मक्का मशिदी जवळ, काळेवाडी मुख्य रोड, सर्व्हे क्र. 12, हिस्सा क्र. 18, पोट हिस्सा क्र. 41, थेरगाव, पिंपरी - चिंचवड, काळेवाडी, पुणे, महाराष्ट्र 411033.
2) कर्जाचे तपशील (वितरण / एनपीए आणि सूचना दिनांक / थकबाकी रक्कम :
(अ) कर्ज खाते क्र. 15056546258 करिता रक्कम रु. 21,46,051/- (रुपये एकवीस लाख शेहेचाळीस हजार एक्कावन्न फक्त) (ब) नॉन-परफॉर्मिंग ॲसेट दि. 03 जानेवारी 2026, (क) मागणी सूचना दिनांक 12 जानेवारी 2026 थकबाकी देय : रु. 2344829.35/- (रुपये तेवीस लाख चव्वेचाळीस हजार आठशे एकोणतीस आणि पस्तीस पैसे फक्त) दि. 14/01/2026 रोजी नुसार सोबत उपरोक्त रकमेवर करारानुसार भविष्यातील व्याज सोबत आनुषंगिक खर्च, किंमत, शुल्क, इ.
3) अचल मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, निवासी युनिट - तळ + 02 मजले, हनुमान नगर, संभाजी नगर, मक्का मशिदीजवळ, काळेवाडी मेन रोड, सर्व्हे क्र. 12, हिस्सा क्र. 18, पोट हिस्सा क्र. 41, थेरगाव, पिंपरी-चिंचवड, काळेवाडी, पुणे, महाराष्ट्र 411033. त्याचा मिळकत क्र. (पीसीएमसी मालमत्ता कर क्र. 1040303241.00) **चतुःसीमा :- पूर्वः** श्री. भोसले यांची मालमत्ता, **पश्चिमः** 20 फूट रस्ता, **उत्तरः** रस्ता, **दक्षिणः** मक्का मस्जिद मागची बाजू.

तुम्हाला, वरील तक्त्यात नमूद केलेल्या तपशीलांनुसार एकूण रक्कम सोबत देयकाच्या तारखेपर्यंतचे कराराच्या दराने पुढील व्याज आणि इतर खर्च, शुल्क आणि त्यावरील आनुषंगिक खर्च हि रक्कम ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून 60 दिवसांच्या आत भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे, असे न केल्यास, नॉर्थर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड ची देय रक्कम वसूल करण्यासाठी वर उल्लेख केलेल्या तारण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम 13(4) आणि कलम 14 अंतर्गत योग्य ती कार्यवाही सुरू करण्यास खालील स्वाक्षरीकार यांना भाग पडेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम 13(13) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री / भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई करण्यात येत आहे.

स्वा./-
प्राधिकृत अधिकारी
नॉर्थर्न एआरसी कॅपिटल लिमिटेड

दिनांक : 15 जानेवारी 2026
ठिकाण : पुणे

---

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट - IV-A - अचल मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

नोंदणीकृत कार्यालय :- 9वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली - 110001, फोन्स :- 011-23357171, 23357172, 23705414, वेब. :- www.pnbhousing.com

शाखा कार्यालय : युनिट क्र. 601, 602, 603, 604, 605, 606, सहावा मजला, कॉन्क्लेव्ह, प्राईड हॉटेल च्या मागे, शिवाजी नगर, पुणे, महाराष्ट्र - 411005.

याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ - डी मध्ये नमूद अचल मालमत्तेचा **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **रचनात्मक / प्रत्यक्ष** ताबा घेतलेला असून (स्तंभ - सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची **''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे''** तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल.
याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम - 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार / गहाणदार / कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला **www.pnbhousing.com** येथे भेट द्यावी.

कर्ज क्र., कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार / कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	तारण मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आ. कि.) (ई)	बयाणा रक्कम (आ. कि. च्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीचा दिनांक व वेळ (आय)	लिलावाचा दिनांक व वेळ (जे)	असल्यास, ज्ञात बोजे / न्यायालयीन कज्जे (के)
HOU/PUN/1216/341627, दिलीप रतन बंडवाल / वर्षा रतन बंडवाल, शाखा : पुणे	रु. 16.28.323.14 आणि 13-11-2024	प्रत्यक्ष	106, 1, इमारत सी2, मंत्रा रेसिडेन्सी, जी. क्र. 01, फोक्सवॅगन प्लांट चाकण समोर, **एमआयडीसी फेज III, निघोजे, पुणे, महाराष्ट्र - 410501**	रु. 11,61,000	रु. 1,16,100	30.01.2026	रु. 10,000	19.01.2026 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00 दरम्यान	31.01.2026 रोजी दुपारी 02:00 ते दुपारी 03:00 दरम्यान	*निरंक / ज्ञात नाही
HOU/PUN/0917/427448 मेहराम नेमचंद जांगीड / मनफुल शाखा : पुणे	रु. 9,23,994.86 आणि 26-06-2021	प्रत्यक्ष	इमारत सी4, नववा मजला, 902, एक्झर्बिया आयफेल सिटी बी1, सी1, सी2, सी3, सी4, सी5, डी1, ई1, गट क्र. 1447, 1448, 1450/1, 1450/2, 1451, 1449,, 1438, 1527/2, **गाव चाकण, खेड, पुणे, महाराष्ट्र - 410501.**	रु. 6,36,000	रु. 63,600	30.01.2026	रु. 10,000	21.01.2026 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00 दरम्यान	31.01.2026 रोजी दुपारी 02:00 ते दुपारी 03:00 दरम्यान	*निरंक / ज्ञात नाही

***सोबत भरण्याच्या व / वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार वर स्तंभ - के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल / अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे / दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने / बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार / बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी. (1)** आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता / अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल / पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकारयांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकुम नाही आणि स्थितीचा उल्लेख स्तंभ क्र. - के मध्ये केला आहे. **(2)** संभाव्य खरेदीदारांनी / बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ - के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया / आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथेपर्यंतचे मर्यादित नसून त्यांनी निविदा / बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तींवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. **(3)** कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार / खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल अन्यथा अशा ठेवी चुकवल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रीच्या पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या 15 दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचे काही भाग जप्त करेल आणि मालमत्ता / अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. **(4) सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकारयांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्र. 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003, वेबसाइट - www.bankeauctions.com, मालमत्तेची तपासणी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत व्यक्ती - श्री. गणेश अंकुश / नीलाक्षी पाटील, टोल फ्री क्र. :** 1800 120 8800, **ई-मेल : auction@pnbhousing.com, यांचेशी संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.**

ठिकाण :- पुणे. दिनांक :- 14.01.2026

स्वा./- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड